**Bachelor of Arts (B.A.) Third Semester Examination**

**MARATHI**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :**—(1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'स्त्रीपुरुषतुलना' या पाठातून ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुषांच्या कोणत्या सामाजिक ज्वलंत प्रश्नांची चर्चा केली आहे ? स्पष्ट करा. 16

**किंवा**

'शिक्षक हा सर्वश्रेष्ठ कलावंत असून तो जीवनाच्या, अखेरपर्यंत ज्ञानाचा शोध होतो ?' असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का म्हणतात ?

2. संत नामदेवांनी श्रीविठ्ठलाच्या लावण्याची शोभा कशी वर्णन केली आहे ते स्पष्ट करून विठ्ठलभक्तिचे व नामस्मरणाचे महत्त्व सांगा. 16

**किंवा**

'फडकतें तुझें तेथेंच निशाण !' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दात लिहा :— 16

**गट 'अ'**

(क) 'रुंभणेयाचा दृष्टांत' या पाठाचा आशय थोडक्यात लिहा.

(ख) आचार्य अत्रे यांच्या पहिल्या व्याख्यानाचे वर्णन करा.

(ग) 'केकावली' या कवितेतून सत्संगतीचा महिमा कसा वर्णन केला, थोडक्यात सांगा.

(घ) कवी अनिल उदासीनतेचे कसे दर्शन घडवितात ?

**किंवा**

**गट 'ब'**

(च) 'यशस्वी वक्ता होण्यासारखा आनंद नाही ह्या आयुष्यात' असे आचार्य अत्रे का म्हणतात ?

(छ) पं. महादेव शास्त्री चंद्रभागेचे वर्णन कसे करतात ?

(ज) 'वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा। सदा हरि कविरायावर फिदा।।' असे राम जोशी का म्हणतात ?

(झ) संत नामदेवांनी तुलशीमहात्म्य कसे वर्णन केले आहे ?

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे लिहा :— 16

**गट 'क'**

(त) इतिवृत्त म्हणजे काय ? त्याचे दोन प्रकार कोणते, वर्णन करा.

(थ) अहवालात्मक इतिवृत्ताचे प्रत्यक्ष लेखन कसे केले जाते ?

(द) 'आकाशवाणी आणि दूरदर्शन ही लोकमानसापर्यंत पोहचणारी प्रभावी माध्यमे आहेत.' स्पष्ट करा.

(ध) बातमीतील निवेदनाची मांडणी कशी असते ?

**किंवा**

**गट 'ड'**

(प) इतिवृत्त लिहिताना कोणती काळजी घ्यावी ?

(फ) अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरूप सांगा ?

(ब) वृत्तपत्रे आणि नियतकालिके यातील फरक स्पष्ट करा.

(भ) बातमीतील भाषा कशी असावी ?

5. **सर्व** प्रश्नांची उत्तरे संक्षिप्त स्वरूपात लिहा :— 16

(1) देवद्वारी समाधी घेणाऱ्या नामदेवांच्या सोबत आणरवी कोण कोण आहेत ?

(2) 'रुंभेण याचा दृष्टांत' चक्रधरांनी कोणाला आणि कोठे सांगितला आहे ?

(3) मोरोपंतांच्या काव्यलेखनाचा हेतू सांगा.

(4) कवी अनिल कोणते कवी म्हणून परिचित होते ? आणि त्यांना कशाचे प्रवर्तक म्हटले जाते ?

(5) 'इतिवृत्त हा एक प्रकारचा दस्तऐवज आहे'. स्पष्ट करा.

(6) अहवालात्मक इतिवृत्ताच्या मर्यादा सांगा.

(7) बातमी वाचल्यानंतर कोणत्या सहा 'क' काराची उत्तरे वाचकाला मिळायला पाहिजे ?

(8) बातमी लिहिताना कोणती पथ्ये पाळावीत ?